# महाराष्ट्र जलमय... पिके खरडली, घरे बुडाली





दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज
● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■

●बीड(महाराष्ट्र) ●वर्ष ५ वे ●अंक १४१ ●गुरूवार, दि. २१ ऑगस्ट २०२५ ●RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 ●पान १ ●पाने ४ ●किंमत ३ रूपये

● dailymarathwadapatra2021@gmail.com ● https://marathwadapatra.com ● https://epaper.marathwadapatra.com ● Mo. 9822152955





## मराठवाड्यात 11 जीव गेले, ४९८ जनावरे दगावली



**बीड । प्रतिनिधी**

मागील पाच दिवसांपासून मराठवाड्यात पावसाने हाहाकार माजवला आहे. १४ ते १९ ऑगस्ट या कालावधीत ११ जणांचा जीव गेला आहे. सोबतच ४ लाख ३८ हजार शेतकऱ्यांना याचा फटका बसला असून तब्बल ३ लाख ५८ हजार हेक्टरवरील पिके पाण्याखाली गेली आहेत. या अतिवृष्टीचा सर्वाधिक फटका हा नांदेड जिल्ह्याला बसला असून, अजूनही सरी बरसत असल्याने शेतकरी चिंतेत आहे. बीड जिल्ह्या मांजरा धरण ओव्हरफ्लो झाले असून, सहा दरवाजे उघडले आहेत. यासह इतरही महत्त्वाच्या प्रकल्पांमध्ये पाणीसाठा वाढला आहे.

### ● ४९८ जनावरे दगावली

या पावसात ४९८ जनावरे दगावली आहेत. यात लातूरमध्ये २४५, तर नांदेडमधील १२६ जनावरांचा समावेश आहे. त्यातही गाय, म्हैस अशा दुधाळ जनावरांची संख्या अधिक आहे.

### ● कोणी पुरात तर कोणी धबधब्याखाली बुडाले

पाच दिवसांत तब्बल ११ जणांचा जीव गेला आहे. यात सर्वाधिक ७ जण हे नांदेड जिल्ह्यातील असून बीड व हिंगोलीतील प्रत्येकी दोघांचा समावेश आहे.

### ● शेतीचे मोठे नुकसान

मराठवड्यातील ८ हजार १६८ हेक्टरवरील बागायत आणि १९८ हेक्टरवर फळपिकांचे नुकसान झाले आहे. जिरायत शेती नुकसानीचा आकडा साडेतीन लाख एवढा आहे. पावसाने ५८८ लोकांचा संसार उघड्यावर आला आहे. पत्रे उडणे, भिंत पडणे अशा दुर्दैवी घटना घडल्या आहेत. यातही सर्वाधिक २७५ घटना नांदेड जिल्ह्यात घडल्या असून छत्रपती संभाजीनगर ६३, लातूर ८२, धाराशिव ६४ यांचा समावेश आहे.

### ● पंचनामे कधी करणार ?

मराठवाड्यात पावसाने नुकसान झाल्यानंतर अद्यापही प्रशासन शेतकऱ्यांच्या बांधावर पोहोचले नाही. हा नुकसानीचा अहवाल प्राथमिक असल्याचा दावा केला जात आहे; परंतु प्रत्यक्षात पंचनामे कधी सुरू होणार आणि शेतकऱ्यांना मदत कधी देणार ? हा प्रश्न आहे



# दुधाला भाव द्या म्हणत खा.सोनवणे झाले आक्रमक

## संसदेसमोर आंदोलन, दूध अनुदान पुन्हा सुरु करण्याचीही मागणी

**बीड । प्रतिनिधी**

बीड महाराष्ट्र राज्यातील दूध उत्पादक शेतकरी त्यांच्या विविध मागण्या मान्य करण्यासाठी वेगवेगळ्या स्तरावर सतत आंदोलन करीत आहेत, परंतु त्यांच्या मागण्यांकडे गांभिर्याने पाहिले जात नाही. यामुळे खा.बजरंग सोनवणे यांनी अनेक खासदारांना एकत्रित करत दि.१९ रोजी संसदेसमोरच आंदोलन केले.

राज्यात शेतकरी आणि दुध उत्पादक अडचणीत आहेत. दुधाला मिळणारा भाव आणि जनावरांवर होणारा खर्च याचा ताळमेळ बसायला तयार नाही. यामुळे दुध उत्पादकांना दुधाचा दर वाढून मिळावा, यासाठी बीडचे खा.बजरंग सोनवणे यांनी सहकारी खासदारांना एकत्रित करून दिल्ली येथे संसदभवन समोर आंदोलन केले. यावेळी गायी व म्हशीच्या दुधाला दर वाढऊन द्यावा, बंद केलेले दूध अनुदान पुन्हा सुरु करावा, दीर्घकालीन 'दूध धोरण' रचना करावी, अशी मागणी करण्यात आली. राज्यात विविध भागात दुध उत्पादकांचे आंदोलन सुरू आहे. त्यांच्या आंदोलनात सर्वसामान्य शेतकरी देखील सहभागी होत असून दि.१९ रोजी दुध उत्पादकांच्या आंदोलनाच्या सम र्थनामधे संसदेच्या दारावर प्रतिकात्मक आंदोलन करण्यात आले. यावेळी दूध उत्पादक शेतकऱ्यासमोरील आव्हाने कमी करणे व दुधाला दर मिळऊन देण्यासाठी प्रयत्नशील राहू, असे खा.बरजंग सोनवणे यांनी म्हटले. यावेळी खा.छत्रपती शाहू



महाराज, खा.निलेश लंके आणि इतर खासदारांची उपस्थिती होती. खा.बजरंग सोनवणे हे शेती आणि शेतकऱ्यांच्या जोडव्यवसायावर लक्ष ठेवून आहेत. दुध उत्पादक अडचणीत सापडले म्हणून त्यांनी आंदोलनाचा निर्णय घेतला होता.. दूध हे शेतकऱ्यांसाठी केवळ उत्पादन नसून जोडधंदा आणि जीवन जगण्याचा अविभाज्य घटक आहे. मात्र, आज दुधाला योग्य भाव मिळत नाही, उत्पादन खर्चापेक्षा कमी दराने विक्री करावी लागत आहे. दुसरीकडे दुधात भेसळ करणारे लोक सर्वसामान्य जनतेच्या आरोग्याशी खेळ करत आहेत. या शेतकरी आणि ग्राहकांशी निगडित प्रश्नांवर इंडिया आघाडीच्या खासदारांनी मंगळवारी (दि.१९) संसद भवनासमोर आंदोलन करत सरकारचे लक्ष वेधले.

# राष्ट्रवादीच्या स्थानिक नेत्यांकडून बीडकरान सहित अजितदादानची ही फसवणूक करण्याचा प्रयत्न?

## १०० कोटीच्या नावाखाली जुनाच नगरोत्थान चा प्रस्ताव दादांसमोर ठेवला होता ; जुना नगरोत्थान चा प्रस्ताव मंजूर करून द्या म्हणत जशास तसा दादांसमोर ठेवला होता : सचिन मुळूक

**बीड । प्रतिनिधी**



२०२३-२४ मध्ये नगरोत्थान योजनेअंतर्गत सादर केलेला प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित होता. स्थानिक राष्ट्रवादी नेत्यांनी हा प्रस्ताव उपमुख्यमंत्री व पालकमंत्री अजितदादा पवार यांच्यासमोर जशास तशा ठेवून मंजुरीसाठी आग्रह केला. प्रत्यक्षात, त्या प्रस्तावातील बऱ्याच कामांची पूर्तता मध्यंतरी इतर योजनेतून झाली होती. त्यामुळे पूर्ण झालेले कामे वगळून फक्त उर्वरित कामांचा प्रस्ताव दादांसमोर सादर करणे आवश्यक होते, पण तसे न करता २०२३-२४ चा नगरोत्थान प्रस्ताव जसाचा तसा अजितदादांच्या समोर ठेवून राष्ट्रवादीच्या स्थानिक नेत्यांनी निधी मिळवण्याचा प्रयत्न करुन पालकमंत्री अजितदादा पवार यांची फसवणूक करण्याचा प्रयत्न केला ? असा आरोप शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी केला आहे.

राज्याचे उपमुख्यमंत्री व जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार यांनी बीडच्या रस्त्यांसाठी शंभर कोटींचा निधी दिल्याची खोटी माहिती राष्ट्रवादीच्या स्थानिक नेत्यांनी देऊन बीडकरांनी फसवणूक केली. पण खरी गोष्ट अशी की बीडमधील रस्त्यांच्या कामासाठी नगरोत्थान योजनेचा प्रस्ताव २०२३-२४ मध्येच दाखल झाला होता. हा प्रस्ताव आजही शासनदरबारी प्रलंबित आहे. या प्रलंबित प्रस्तावातील बरीचशी कामे इतर योजनांतून पूर्ण झाली तर काही ठिकाणी कामे अर्धवट झाली आहेत. अशी झालेली कामे वगळून फक्त उर्वरित कामांचा प्रस्ताव राष्ट्रवादीच्या स्थानिक नेत्यांनी पालकमंत्री अजित दादा पवार यांच्याकडे सादर करणे आवश्यक होते. मात्र तसे करण्या ऐवजी राष्ट्रवादीच्या स्थानिक नेत्यांनी २०२३-२०२४ मधील नगरोत्थान योजनेचा शासन दरबारी प्रलंबित प्रस्ताव जसाच्या तसा दादांसमोर ठेवून शासनाकडून मंजूर करून द्या अशी मागणी केली .

यातून स्पष्ट होते की प्रत्यक्षात झालेल्या कामांवर पुन्हा निधी खेचणे आणि बोगस बिले उचलणे हा त्यामागचा राष्ट्रवादीच्या स्थानिक नेत्यांचा उद्देश होता का ?

# आपण दोघे भाऊ भाऊ आणि शंभर कोटी वाटून खाऊ : नवनाथ अण्णा शिराळे पाटील

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य सरकारचे मुख्यमंत्री देवाभाऊ फडणवीस साहेब आणि शिवसेना चे नेते उपमुख्यमंत्री एकनाथ भाऊ शिंदे साहेब अजित दादा पवार साहेब असताना तसेच महाराष्ट्राच्या रणरागिणी संघर्ष कन्या भारतीय जनता पार्टीच्या आमच्या नेत्या आदरणीय पंकजाताई मुंडे या असताना शंभर कोटी बीड शहराला देण्याच्या फंडाची घोषणा दादांनी केली आहे याचे आम्ही स्वागत करत आहोत असेही प्रसिद्धी



पत्रकाच्या माध्यमातून भारतीय जनता पार्टीचे नेते नवनाथ अण्णा शिरोळे पाटील यांनी म्हटले आहे परंतु या शंभर कोटी रुपये वाटून खाण्याच्या स्पर्धा दोन क्षीरसागर बंधूंमध्ये लागल्याचे सध्या चित्र पाहावयास मिळत आहे हे दुर्दैव आहे .

शहरांमध्ये विकासासाठी आत्ताच नुकताच बीड जिल्ह्याचे पालकमंत्री तथा महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री नामदार अजित दादा यांनी शंभर कोटी देण्याची घोषणा केली. परंतु ती घोषणा केली परंतु ती घोषणा कितपत खरी आहे याच्यावर देखील शंका कु शंका नागरिकांमधून व्यक्त होत आहेत. परंतु याच पार्श्वभूमीवर या बीड शहरातील प्रस्थापित असणारे क्षीरसागर कुटुंब गेल्या पंचवीस तीस वर्षापासून नगरपालिकेवर सत्ता गाजवणारे यांचे चुलते बीड जिल्ह्याचे माजी पालक मंत्री होते. महाराष्ट्राचे कॅबिनेट मंत्री होते हे सगळं असताना देखील त्यांना बीड जिल्ह्याचा विकास करता आला नाही. यांचे चुलते बीड नगरपालिकेचे नगराध्यक्ष भारत भूषण क्षीरसागर म्हणून बीड शहरांमध्ये कार्यरत होते. परंतु बीड शहराचा कुठलाच विकास झालेला नसून सगळा भकास झालेला दिसत आहे.

# पुढारी आणि जिल्हा प्रशासनाने पाहणी आणि पंचनाम्याची नाटकं बंद करावीत

**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यासह राज्यभरात अतिवृष्टीमुळे शेतपिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याची दखल घेत लवकरच नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना सरकारी मदत दिली जाईल, असे आश्वासन दिले आहे. त्यानुसार जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी जिल्ह्यातील प्रशासनाला तातडीने पंचनामे करून अहवाल सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत. मात्र, या पंचनाम्यांचे काम



केवळ फोटोसेशनपुरतेच मर्यादित राहत असून, प्रत्यक्षात शेतकऱ्यांना मदत मिळत नाही अशी नाराजी शेतकऱ्यांतून व्यक्त होत आहे.

बीड तालुक्यातील जाधववाडी येथील शेतकरी नानीबाई भारत जाधव यांनी आपली व्यथा व्यक्त करताना सांगितले की, दरवर्षी पावसाळ्यात अडीच एकर शेती पाण्याखाली जाते. सोयाबीन, उडीद, मुग आदी पिकांचे मोठे नुकसान होते. पुढारी व अधिकारी येतात, फोटो काढतात, पंचनामे करतात, आश्वासन देतात ; पण नंतर ढुंकूनही पाहत नाहीत. नानीबाई जाधव यांच्या मते, केवळ पंचनाम्यांची नाटकं करून शेतकऱ्यांच्या जखमांवर मीठ चोळले जात आहे. जाधववाडी शिवार राष्ट्रीय महामार्गालगत असल्याने येथे अनेकदा पुढारी व अधिकारी दाखल होतात.

◆ पान ४ वरून पुढे...

## 2011 पूर्वीच्या...

माणसाचा मुलभूत हक्क आहे. शासनाच्या या उपक्रमातून अंबाजोगाईतील नागरिकांना कायदेशीर घराचा हक्क मिळवून देणे ही म ाझ्यासाठी आनंदाची बाब आहे. यापुढेही शहरातील प्रत्येक कुटुंबाला दिलासा मिळावा यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू राहतील. या कार्यक्रम ाला उपविभागीय अधिकारी दीपक वजाळे, तहसीलदार विलास तरंगे, नगर परिषद मुख्याधिकारी प्रियंका टोंगे, महादू मस्के, जगन बापू सरवदे, पंडितराव जोगदंड, संजय गंभीरे, बनसोडे मामा यांच्यासह अनेक मान्यवर व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आष्टीत श्री संत...

गौरव केला. संतांच्या विचारांचा प्रसार करण्याचा आणि त्यांच्या आदर्शावर चालण्याचा संकल्पही सर्वांनी व्यक्त केला. या कार्यक्रमात नाभिक संघटनेचे तालुकाध्यक्ष प्रविण कदम, आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचे अध्यक्ष अविनाश कदम, बाबुराव कदम, पत्रकार गणेश दळवी, कैलास कदम, दिलीप कदम, मारुती जपलवार, बाबासाहेब कदम, गोकुळ राऊत, महादेव कदम, पांडुरंग दळवी, बाळासाहेब कदम, बिबीशन साळुंके, शिक्षक अमोल कदम, सचिन कदम, संजय वखरे, राम कदम, संतोष राऊत, अंबादास कदम, पवन कदम, लखन कदम, विनोद कदम, सागर कदम, हरी कदम, अक्षय कदम, राम कदम, गोविंद कदम, राजेंद्र दळवी, पंडित कदम, संजय पवळ, गणेश राऊत, मनोज कदम, भागवत कदम, महेश कदम, ऋषी कदम, तैनूर शेख, परसुराम चव्हाण, दत्ता कदम आदी मोठ्या संख्येने नाभिक समाजबांधव उपस्थित होते.

## डिजिटल मीडिया...

असल्याच्या सुचना परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख सर यांनी दिल्या आहेत.१४ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी १० वाजता एकनाथ

◆ पान ४ वरून पुढे...

रंगमंदिर क्रांती चौक येथे मान्यवरांच्या हस्ते अधिवेशनाचे उद्घाटन होणार असून डिजिटल मिडिया विश्वातील मान्यवरांची व्याख्यानं देखील आयोजित केली आहेत. तसेच उत्कृष्ट युट्यूब आणि पोर्टल चालविणाऱ्या दहा संपादकांचा अधिवेशनात सन्मान करण्यात येणार आहे. सबस्क्राईबर्स, व्ह्यूवर्सची संख्या, तांत्रिक बाजू, बातम्यांची निवड आणि लोकांचे प्रश्न उत्तम पध्दतीनं मांडणा-या संपादकांची निवड करून त्यांचा गौरव केला जाईल.डिजिटल मिडिया परिषदेची अद्याप राज्य कार्यकारिणी झालेली नाही.अधिवेशनात राज्य कार्यकारिणी सुध्दा निवडली जाणार असल्याचे मा.श्री.एस.एम.देशमुख सर यांनी आदेशीत केले आहे. डिजिटल मि डियाला सरकारने जाहिराती देण्याचा निर्णय घेतला असला तरी या जीआर मध्ये युट्यूब चॅनल्स तसेच न्यूज पोर्टलचा उल्लेख केला गेला नाही. ही बाब मुख्यमंत्र्यांच्या नजरेस आणून देत त्यांना जाहिराती मिळाव्यात असा प्रयत्न केला जाणार असल्याचे तसेच डिजिटल पत्रकारांना अधिस्वीकृती मिळावी यासाठी देखील सरकारकडे पाठपुरावा केला जाणार असून अधिवेशनात तसे ठराव मांडले जाणार आहेत. प्रिन्ट आणि इलेक्ट्रॉनिक मिडियाचे अनेक प्रश्न अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेने मार्गी लावले आहेत.त्याच प्रमाणे डिजिटल मिडियाला भेडसावणारे प्रश्न हाती घेऊन डिजिटल मिडिया परिषद त्यांचा पाठपुरावा करणार आहे. त्यामुळे अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेच्या संलग्न असलेल्या महाराष्ट्र राज्यातील डिजिटल मिडिया परिषदेच्या राज्य पदाधिकारी तसेच जिल्हाध्यक्ष व तालुका अध्यक्ष यांनी सुध्दा आपल्या जिल्ह्यातील व तालुक्यातील सर्वांसोबत संपर्क साधावा व सर्वांना सोबत घेऊन जिल्हास्तरीय कार्यकारिणी, तालुका स्तरावर असलेल्या कार्यकारिणी मधील पदाधिकारी व सदस्यांनी या महत्वपूर्ण असलेल्या राज्यव्यापी अधिवेशनात सहभागी व्हावे असे आवाहन देखील डिजिटल मिडिया परिषदेचे प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे यांनी केले आहे.

## जागतिक छायाचित्र...

काळासोबत नवनवीन तंत्रज्ञानांची जोड देऊन या व्यवसायाने भरारी

◆ पान ४ वरून पुढे...

घेतली असून यामध्ये आता स्पेशलायझेशन देखील झाल्याने ज्याच्या नजरेची तीक्षता आणि बौद्धिक कल्पकता आहे असाच फोटोग्राफर तो क्षण टिपण्याचा प्रयत्न करतो.शिवाय आपल्या आयुष्यातील क्षण साठवून ठेवण्याचं काम आपण करत असतो त्यामुळे सर्वांनी या कलेला व्यावसायिक रूप न देता कलेप्रती आदर दाखवून ही कला जोपासली तर आपली आर्थिक उन्नती देखील आपोआप होत राहते असे मत सर्व उपस्थित फोटोग्राफर बांधवांनी व्यक्त केले.यावेळी तालुक्यातील आजी माजी फोटोग्राफर, व्हिडिओग्रफार मोठ्या संख्येनं उपस्थित होते.

## नाट्य परिषद...

संस्था बीड, ७.आता काय जळतंय सौ.के.एस.के.महाविद्यालय बीड, ८.द लास्ट बॅटर सौ.के.एस.के.महाविद्यालय बीड,९.भुक्कड पिंप्री सौ.केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर उर्फ काकू कला,विज्ञान व वाणिज्य म हाविद्यालय बीड,१०. पाऊस विद्याभुवन शिक्षण प्रसारक मंडळ सिंदफणा पब्लीक स्कूल माजलगाव, ११.वयाच गणित सरस्वती भुवन आर्टस ॲण्ड कॉमर्स कॉलेज छत्रपती संभाजीनगर या सर्व एकांकिका सौ.के.एस.के.म हाविद्यालयातील सांस्कृतिक सभागृहात शनिवार दिनांक २३ ऑगस्ट रोजी सकाळी ९ वाजल्या पासून सुरू होणार असून शहरातील जास्तीत जास्त रसिक श्रोते या सर्व एकांकिकेचा अस्वाद घ्यावा असे आवाहन शाखा प्रमुख तथा नाटय परिषद अध्यक्ष डॉ.दीपा क्षीरसागर यांनी केले आहे.तसेच केंद्र प्रमुख म्हणून डॉ.संजय पाटील देवळाणकर तथा स्थानिक समन्वयक म्हणून मिलींद शिवणीकर,प्रा.अस्सलम शेख,डॉ.डी.डी.रामटेके,प्रा. विजय राख यांनी केले आहे.

## गणेशोत्सव - ईद ए...

हे सण एकात्मतेने जबाबदार नागरिक म्हणून साजरा करावेत. यावर्षीचा गणेशोत्सव राज्य महोत्सव म्हणून साजरा होणार असून, उत्कृष्ट देखावे, पर्यावरणपूरक गणेश मुर्ती, निर्माल्य विसर्जन हे व्यवस्थित कचरा

◆ पान ४ वरून पुढे...

न होता करावेत. तसेच ध्वनी प्रदूषण, विजेची सुरक्षितता, स्वच्छता आणि वाहतुक व्यवस्था आदींचे योग्य नियोजन करावे.तसेच गणेशोत्सवाच्या उत्कृष्ट देखाव्यास पु.ल. देशपांडे अकादमी तर्फे प्रथम, द्वितीय आणि तृतीय पुरस्कार देण्यात येणार असून, बीड जिल्ह्यातील गणेश भक्तांनी उत्कृष्ट देखावे, स्वच्छता पाळून बक्षिस जिंकण्याचा प्रयत्न करावा.

तसेच पोलीस अधीक्षक कार्यालयीन यंत्रणेने सुरक्षा व्यवस्था अधिक बळकट ठेवावी. संवेदनशील भागांमध्ये विशेष पोलीस बंदोबस्त ठेवून सीसीटीव्हीद्वारे देखरेख ठेवावी. वाहतूक शाखेने मिरवणुकांच्या मार्गावर विशेष लक्ष ठेवावे. नगरपरिषद व ग्रामपंचायत विभागांनी स्वच्छता ठेवावी. दिवाबत्ती आणि विसर्जन स्थळांवरील सुविधा वेळेत पूर्ण कराव्यात. तसेच आरोग्य विभागानेही वैद्यकीय पथके तैनात ठेवावीत. गणपती स्थापनेच्या दिवशीची आणि गणपती विसर्जनाच्या दिवशीची वाहने सुस्थितीत असल्याची तपासणी करुनच वापरण्यात यावीत. विजेच्या लोबंकळणाऱ्या तारा, विजेचे वाकलेले खांब हे सुस्थितीत करुन घ्यावेत. गणेश मुर्तीचे विसर्जन करण्यासाठी विहीरी अधिग्रहीत कराव्यात. तसेच विहीरीत पुरेसे पाणी आहे की नाही, हे पण तपासून पाहावे. गणेश मंडळानी ऑनलाईन परवाना घेवून गणपती स्थापन करावेत. ग्रामीण भागात तहसीलदार आणि गटविकास अधिकारी यांच्याकडे परवानगीसाठी रितसर अर्ज करावेत. डिजेचा आवाज व लाईटींगचा प्रकाशासाठी ठरवून दिलेल्या नियमाप्रमाणेच ठेवावा. जेणे करुन वृध्द आणि आजारी व्यक्ती, लाहन बालकांना त्रास होणार नाही. सर्व विभागांनी आपापल्या जबाबदाऱ्या योग्यप्रकारे पार पाडाव्यात आणि एकमेकांशी समन्वय ठेवत हे उत्सव शांततेत पार पाडावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी जॉनसन यांनी यावेळी केले यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी बैठकीपूर्वी शासन निर्णयानुसार गणपती उत्सव कसा साजरा करावा याची माहिती दिली. यावेळी बैठकीस विविध विभागातील अधिकारी, गणेश मंडळाचे पदाधिकारी, शांतता समिती सदस्य व इतर सदस्यांची उपस्थिती होती.

◆ पान १ वरून पुढे...

## वडवणी न्यायालयात...

मॅडम यांनी घटनास्थळाला भेट दिली आहे तसेच वडवणी पोलीस स्टेशनच्या सपोनि वर्षा शिंदे मॅडम याना घटना घडल्याचे समजताच तात्काळ घटनास्थळी पोहचले व घटना स्थळाचा पंचनामा करून मृतदेहचे शवविच्छेदन प्राथमिक आरोग्य केंद्र वडवणी येथे करण्यात आले आहे. तरी वडवणी येथे न्याय मंदिरातच सरकारी वकिलाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडल्याने महाराष्ट्रासह बीड जिल्ह्यात खळबळ उडाली आहे.

## एका दणक्यात...

देशमुख यांनी म्हंटले आहे.बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लिमिटेड, बीड ही सातत्याने वादाच्या भोवऱ्यात असते. जिल्हा बँक शेतकऱ्यांची बँक राहिलेली नसून पुढाऱ्यांची बँक झालेली आहे. त्यामुळे सातत्याने मागणी लावून धरत तेथील संचालक मंडळ अस्तित्वात येऊ दिले नाही. मात्र या ठिकाणी नेमलेले प्रशासकीय अधिकारी बँकेच्या भल्यासाठी लक्ष देत नसल्याचे दिसत आहे. जिल्हा बँकेच्या प्रशासकीय मंडळाला त्या बँकेच्या आवारात गेल्या दीड वर्षापासून बेकायदेशीर रीतीने मुक्काम ठोकणाऱ्या तालुका उपनिबंधक सहकारी संस्था, बीड यांना रोखता आले नाही, ही बाब योग्य नाही. दरम्यान, यात ॲड. देशमुख यांनी सहकार आयुक्त कार्यालय पुणे, विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था लातूर यांनीही लक्ष घातले आहे. एकीकडे दीड वर्षापासून शासनाकडून घर भाडे

◆ पान १ वरून पुढे...

भत्ता घेणे आणि फुकट रहाणे, याचीही आता चौकशी होईल, असे ॲड. देशमुख यांनी म्हटले आहे.

## चोरीचे वाहन....

पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर यांच्या व सहकार्यांच्या हा प्रकार चोरीचा असल्याचे लक्षात येताच सदरील वाहनधारकास शिताफीने पकडून त्यांनी वाहन ताब्यात घेतले. याबाबत विस्तृत माहिती अशी की, दि.१९ ऑगस्ट २०२५ मंगळवार रोजी पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर व सहकारी पो.ह.विष्णु काकडे, पोलीस अंमलदार वसीम शेख, चिंतामण शिंदे, चालक संतोष हरके, नारायण वाघमारे, पोलीस हवालदार राजाभाऊ तांदळे यांनी सुभाष रोडवरील वाहतुक शाखेच्या कार्यालयासमोर कार्यवाही चालू असतांना मोटारसायकल चालक नामे प्रशांत मंगेश देवतवाल (२० वर्षे) रा.विरशैव कॉलनी, पेठ बीड ता.जि.बीड हा होंडा कंपनीचे वाहन क्रमांक एम.एच.२२ ई ७०७६ चालवत असतांना त्यास दंडात्मक कार्यवाहीसाठी ताब्यात घेतले व चौकशी करत असतांना तो उडवा-उडवीची उत्तरे देवू लागला सदर प्रकार हा पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर यांच्या लक्षात येताच त्यांनी डिव्हाईसवर सदरील वाहनासंबंधी माहिती पाहिली असता सदर वाहन २०२२ मध्ये परभणी जिल्हा नांनलपेठ पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.०२२९/२२ कलम ३७९ भादवि प्रमाणे गुन्हा दाखल असल्याचे आढळून आले. यावेळी पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर यांनी व त्यांच्या सहकार्यांनी वाहनचालक व वाहन पुढील कार्यवाहीस्तव पोलीस स्टेशन बीड शहर येथे जमा केले.

**जाहीर प्रगटन**

**मा.श्रीमती. एस.डी. सोनी, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज १११४/२०२५**

**बाबुराव बळीराम नाईकवाडे व ईतर विरूध्द निरंक**

अर्जदार- १. बाबुराव पि. बळीराम नाईकवाडे, वय ३८ वर्षे, धंदा - उसतोड मजुरी, २. प्रतिक्षा पि. बाबुराव नाईकवाडे वय १४ वर्षे, धंदा - शिक्षण, अज्ञान, पालनकर्ते वडील, बाबुराव नाईकवाडे, रा. मु. पो. कोठारबन, ता. वडवणी, जि. बीड, ह.मु. मु. पो. बोरदेवी, ता. जि. बीड.

विरुध्द निरंक

**मागणी - बॉम्बे रेग्यूलेशन ॲक्ट. १८२७ कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत हौसाबाई भ्र. बळीराम कळसाने, यांचा मृत्यु झाला, वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे.

यांन

ज्याअर्थी मयत हौसाबाई प्र. बळीराम कळसाने, यांचा मृत्यु दिनांक १२ / ११ / २०२४ रोजी झाल आहे. यांचा मृत्यु वरील अर्जदारा व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

मयत हौसाबाई भ्र. बळीराम कळसाने, यांच्या मृत्युनंतर वरील अर्जदारांना शासकीय व निमशासकीय कामासाठी सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्यांचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयत हौसाबाई भ्र. बळीराम कळसाने, यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १६/०८/२०२५ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्याने दिले.

**सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. २०/०९/२०२५ आहे.**

**मार्फत- ॲड. घुगे जी. एस.**

**आदेशावरून.**

(स्वाक्षरीत) शिक्का (स्वाक्षरीत)

क.लिपीक — अधिक्षक, दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड

**जाहीर प्रगटन**

**मा. श्री. ए. एम. फडतरे, ४ थे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक १११५/२०२५**

अर्जदार- १) शिवाजी पि. काशिनाथ घुगे, वय ६१ वर्षे, धंदा-शेती, (२) परमेश्वर पि. उत्तरेश्वर घुगे, वय ३८ वर्षे, धंदा-शेती, ३) रामेश्वर पि. उत्तरेश्वर घुगे, वय-३५ वर्षे, धंदा-शेती, (४) सुदर्शन पि. उत्तरेश्वर घुगे, वय-३२ वर्षे, धंदा शेती, ५) गंगुबाई भ्र. उत्तरेश्वर घुगे, वय ५५ वर्षे, धंदा-शेती, वरील १ ते ५ रा. बोरफडी, ता. जि. बीड.

विरुध्द

गैरअर्जदार :- निरंक — अर्जदार हे भारतीय आहेत

**प्रकरण :- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

ज्याअर्थी अर्जदार यांनी मयत नाम काशिनाथ अप्पाराव घुगे यांचे वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

मयत नाम काशिनाथ अप्पाराव घुगे, रा. बोरफडी, ता. जि. बीड हे दिनांक २०/०६/२००१ रोजी बोरफडी, ता. जि. बीड येथे मयत झालेलं आहेत. अर्जदार क्र. १ हे मयताचा मुलगा आहे. अर्जदार क्र. २ ते ४ हे मयताचे नातु आहेत व अर्जदार क. ५ ही मयताची सून आहे. मयताची पत्नी १५ वर्षापुर्वी मयत झाली आहे. मयताचा मुलगा उत्तरेश्वर काशिनाथ घुगे हा दिनांक १७/१०/२०१८ रोजी राहते घरी मयत झाला. अर्जदार यांच्याशिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत.

अर्जदारांचं असंही म्हणणं आहे की, शासकीय कामासाठी, कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रम ाणपत्राची आवश्यकता आहे म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यांत येते की, सदरील अर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचं असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आंत या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत द्यावी. जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदाराचे हक्कांत त्यांचा हक्काबाबतचा पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे वारस असल्याद्दलचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नांद घ्यावी. पुढील दिनांक २०/०९/२०२५

आज दिनांक १६/०७/२०२५ गंजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**मार्फत- ॲड. घुगे जी. एस.**

**आदेशावरून.**

(स्वाक्षरीत) शिक्का (स्वाक्षरीत)

क.लिपीक — अधिक्षक, दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# 'मल्टिस्टेट' घोटाळ्यात शहांची एन्ट्री; लिक्विडेटरमार्फत मिळणार पैसे, ठेवीदारांना दिलासा

## खा.बजरंग सोनवणे यांनी जिजाऊ, ज्ञानराधा, शुभकल्याण, राजस्थानी पतसंस्थांबाबत मांडला होता संसदेत प्रश्न

**माजलगाव । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यासह राज्यातील विविध भागात शाखा असलेल्या ज्ञानराधा, जिजाऊ, शुभ कल्याण, जिजामाता व राजस्थानी मल्टीस्टेट पंतसंस्था चालकांनी ठेवीदारांना कोट्यावधींचा चुना लावलेला आहे. ठेवीदारांना त्यांचे पैसे परत मिळावेत, यासाठी खा.बजरंग सोनवणे यांनी संसदेत व संसदे बाहेर सतत पाठपुरावा केलेला आहे. खा.सोनवणे यांनी संसदेच्या अधिवेशनात प्रश्न उपस्थित केला होता. त्यांच्या सततच्या पाठपुराव्यामुळे व प्रभावी मांजणीमुळे या प्रकरणी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी लक्ष घातले असून आता ठेवीदारांना लिक्विडेटरमार्फत ठेवी परत मिळतील, असे लेखी उत्तरही दिले आहे. बहु-राज्य सहकारी पतसंस्थांनी ठेवीदारांचे पैसे न परतवल्याबाबत लोकसभा प्रश्नोत्तरात केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांनी महत्त्वाची माहिती दिली. बीडचे खा.बजरंग सोनवणे यांनी अशा सर्व बहुराज्यिय पतसंस्थांमधील ठेवी परत मिळण्यासाठी संसदेमधे प्रश्न उपस्थित करुन या विषयाकडे सरकारचे लक्ष वेधले होते. सदर संस्थांविरोधात अनेक तक्रारी आल्यानंतर केंद्रीय निबंधकांनी महाराष्ट्र शासनाच्या निबंधकांना चौकशी करण्याचे आदेश दिले होते. चौकशी अहवाल समाधानकारक नसल्याने या संस्थांवर बहु-राज्य सहकारी संस्था अधिनियम २००२ अंतर्गत कलम ८६ नुसार विघटन आदेश देण्यात आले असून कलम ८९ नुसार लिक्विडेटर नेमण्यात आले आहे. नेमण्यात आलेले लिक्विडेटर



हे संस्थांची चल/अचल मालमत्ता विक्री करून कलम ९० व नियम २० व २९ नुसार ठेवीदारांना पैसे परत करणार असल्याची माहिती देण्यात आली. सरकारने ठेवीदारांचा विश्वास पुनर्स्थापित करण्यासाठी २०२३ मध्ये बहु-राज्य सहकारी संस्था सुधारणा कायदा लागू केला आहे. यात सहकारी निवडणूक प्राधिकरण, लोकपाल नियुक्ती, पारदर्शक लेखापरीक्षण, नवीन गुंतवणूक मार्गदर्शक तत्वे, संचालक अपात्रता निकष व फसवणुकीवर कठोर कारवाई अशा अनेक तरतुदी करण्यात आल्या आहेत. त्यामुळे बीड जिल्ह्यासह इतर भागातील ठेवीदारांना संस्थांच्या मालमत्तेतून कायदेशीररित्या परतफेड मिळणार असून, सरकारने त्यांच्या हितासाठी ठोस उपाययोजना केली असल्याचे केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांनी उत्तरात म्हटले आहे.

### खा.सोनवणे राहिले ठेवीदारांची पाठीशी उभा

**बीड जिल्ह्यासह मराठवाड्यात अनेक मल्टिस्टेटवाल्यांनी सामान्य ठेवीदारांना चुना लावलेला आहे. सदरील प्रकरणात ठेवीदारांनी खा.बजरंग सोनवणे यांची भेट घेवून आमचा प्रश्न संसदेत मांडा, आम्हाला न्याय द्या, असे म्हटले होते. खा.बजरंग सोनवणे यांनी ठेवीदारांचा विचार करून संसदेत प्रश्न उपस्थित केला होता. आज केंद्रीय मंत्री यांनी दिलेल्या उत्तरामुळे ठेवीदारांना मोठा दिलासा मिळाला असून ठेवीदारांनी खा.सोनवणे यांचे आभार मानले आहेत.**

# फॅशन शोमध्ये शौर्यची कामगिरी

## बीडमध्ये तुलसी समूहाकडून चॅम्प ऑन रॅम्प स्पर्धा

**बीड । प्रतिनिधी**

देवगिरी प्रतिष्ठान संचलित तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईन यांच्या वतीने रविवारी (दि.१७ ऑगस्ट) चॅम्प ऑन रॅम्प या राज्यस्तरीय लहान मुलांच्या फॅशन शोचे भव्य आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत राज्यातील विविध जिल्ह्यांमधून लहानग्या स्पर्धकांनी उत्साहाने सहभाग घेतला. रॅम्पवरच्या आत्मविश्वासपूर्ण सादरीकरणातून प्रत्येकाने आपले कौशल्य दाखवले. याच स्पर्धेत तुलसी इंग्लिश स्कूलचा शौर्य सुनील डोंगरे या लहानग्या स्पर्धकाने ३ ते ६ वयोगटात थेट टॉप-५ मध्ये स्थान मिळवत राज्य पातळीवर बीडचा झेंडा फडकावला. शौर्यच्या या यशामुळे त्याचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. तुलसी एज्युकेशनचे संचालक प्रा. प्रदीप रोडे यांच्या संकल्पनेतून चॅम्प ऑन रॅम्प सिजन एक ही राज्यस्तरीय स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.यावेळी आयकर विभागाच्या उपआयुक्त श्रीमती नितीका विलास, चला हवा येऊ द्या फेम प्रसिद्ध विनोदी अभिनेते अंकुर वधावे, तुलसी महिला मंडळाच्या अध्यक्षा श्रीमती



दीपा रोडे यांचा समावेश होता. या सर्व मान्यवरांनी शौर्यच्या आत्मविश्वासपूर्ण सादरीकरणाचे आणि मिळालेल्या यशाचे कौतुक केले. तुलसी इंग्लिश स्कूलच्या यूकेजी वर्गाच्या शिक्षिका फातिमा शेख यांनी विद्यार्थ्यांची अतिशय उत्तम तयारी करून घेतली होती. प्राचार्या उमा जगतकर, शिक्षिका फातिमा शेख तसेच शौर्यचे आई-वडील यांच्या सततच्या प्रोत्साहन आणि मार्गदर्शनामुळेच हे यश शक्य झाले. शौर्यने आपल्या नैसर्गिक आकर्षक व्यक्तिमत्त्व, आत्मविश्वास व प्रभावी सादरीकरणाच्या जोरावर परीक्षकांची मने जिंकली. शौर्यच्या पुढील शैक्षणिक व कलागुणांच्या प्रवासासाठी सर्व स्तरातून त्याला मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या जात आहेत.

# पिंपळवाडी हायस्कूल विद्यालयात सद्भावना दिन संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

दि२०/८/२५ बुधवार रोजी पिंपळवाडी हायस्कूल पिंपळवाडी विद्यालयात सद्भावना दिन म्हणून पंतप्रधान राजीव गांधी यांची जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी शाळेचे कर्तव्यदक्ष मुख्याध्यापक श्री प्रदीप जगताप सर होते. शाळेचे उपक्रमशील मुख्याध्यापक श्री प्रदीप जगताप सर यांनी प्रथम पंतप्रधान राजीव गांधी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या प्रतिमेला अभिवादन



केले. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक श्री. भरणे सर यांनी केले. श्री खटाने सर यांनी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या कार्याविषयी मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा मुख्याध्यापक श्री जगताप प्रदीप सर यांनी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या कार्याविषयी सखोल माहिती सांगितली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री जाधव सर यांनी केले. या कार्यक्रमाचे आभार श्री. देशमाने सर सर यांनी मानले प्रसंगी शाळेतील ज्येष्ठ शिक्षक श्री ढगे सर, श्री जोशी सर, श्री येवले सर, श्री गाडेकर सर, श्री चौधरी सर, श्री देशमाने सर, श्री काशीद सर, श्री भरणे सर, श्री खटाणे सर, नाईकवाडे सर, श्री शेवंते सर, श्री जाधव सर, श्री कोळेकर सर, श्री वाघमारे सर, श्री देशमाने बाळासाहेब, दत्ता साळवे तसेच सर्व विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहात उपस्थित राहून शाळेत सद्भावना दिन संपन्न झाला.

## अंथरवण पिंपरी (तांडा)च्या साईराज पवार ची नासा भेटीसाठी निवड

**बीड । प्रतिनिधी**

जिल्हा परिषदेच्या शाळेमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना इस्रो आणि नासा या अंतराळ संशोधन संस्थांना भेटीची संधी मिळण्यासाठी तीन टप्प्यात होणाऱ्या चाचणी परीक्षांचे आयोजन करण्यात आले होते. त्यापैकी एक लेखी व दुसरी ऑनलाइन परीक्षा घेण्यात आली. या परीक्षेमध्ये अंथरवण पिंपरी (तांडा) ता. बीड येथील सहशिक्षक पवार गोविंद गिन्यानदेव यांचा चिरंजीव साईराज गोविंद पवार जुन्नर ता. जि. पुणे येथील जि.प. शाळेतून तालुक्यातून प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाला व त्याची अमेरिकेतील नासा



या अंतराळ संस्थेस भेटीसाठी निवड झाली आहे. त्याच्या या निवडीबद्दल अंथरवन पिंपरी तांडा येथील व परिसरातील ग्रामस्थांनी, हितचिंतक, मित्रपरिवार, नातेवाईकांनी त्याच्या पुढील वाटचालीसाठी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.

## आर्टीच्या स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण नोंदणीला 28 ऑगस्ट पर्यंत मुदतवाढ

**मुंबई । प्रतिनिधी**

अण्णा भाऊ साठे संशोधन व प्रशिक्षण संस्थेमार्फत (आर्टी) राज्यातील मातंग व त्यातील तत्सम जातीच्या उमेदवारांसाठी विविध स्पर्धा परीक्षांकरिता अनिवासी पूर्व प्रशिक्षण देण्यात येणार आहे. त्याकरीता २८ ऑगस्ट २०२५ पर्यंत ऑनलाईन अर्ज करण्यास मुदतवाढ देण्यात आल्याची माहिती आर्टीचे व्यवस्थापकीय संचालक सुनील वारे यांनी दिली आहे.

मांग, मातंग, मिनिमादिग, दखनी- मांग, मांग- म्हशी, मदारी, गारुडी, राधेमांग, मांग गारोडी, मांग गारुडी, मादगी व मादिगा समाजातील जे उमेदवार १२ वी आणि पदवीधर परीक्षा उत्तीर्ण आहेत अशा पात्र उमेदवारांनी https://barticet.in/RTI या अधिकृत संकेतस्थळाला भेट देऊन ऑनलाईन स्वरुपात अर्ज करावेत. २९ ते ३० ऑगस्ट २०२५ या दोन दिवसात उमेदवारांनी त्यांच्या ऑनलाईन अर्जात दुरुस्ती व प्रिंट काढण्यासाठी देण्यात आले आहेत. त्यानंतर या प्रशिक्षणासाठी विद्यार्थ्यांची सामयिक प्रवेश परीक्षा (ङोप एर्पीरपलश ढर्शीी-उएढ) घेऊन गुणवत्तेनुसार निवड करण्यात येणार आहे.

महाराष्ट्र शासनामार्फत सर्वंकष धोरण निश्चित करण्यात आले असून त्यानुसार बार्टी संस्थेमार्फत टीआरटीआय, सारथी, महाज्योती, आर्टी या संशोधन संस्थांच्या स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रमांचे संनियंत्रण व अंमलबजावणी बार्टी संस्था करणार आहे.

११ महिन्यासाठी स्पर्धा परीक्षेचे पूर्व प्रशिक्षण- राज्यातील पात्र व इच्छुक उमेदवारांसाठी ११ महिन्यांकरीता यूपीएससी, एमपीएससी राज्यसेवा, अराजपत्रित सेवा, महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा (एमईएस), न्यायिक सेवा (जेएफएमसी) आणि सहा महिन्यांसाठी बँक (आयबीपीएस), कर्मचारी निवड आयोग (एसएससी), पोलीस- सैन्य भरती पूर्व प्रशिक्षण खासगी नामांकित व्यवसायिक प्रशिक्षण संस्थेमार्फत देण्यात येणार आहे.

प्रशिक्षण कालावधीकरीता विद्यावेतन- प्रशिक्षण कालावधीत दर महिना सहा ते १३ हजार रुपये विद्यावेतन त्यासोबत पुस्तक संच, बुट व इतर खर्चाकरिता एकवेळ १२ ते १८ हजार रुपये अनुषांगिक लाभ देण्यात येणार आहे. त्याकरीता पात्र उमेदवारांकडून ऑनलाईन स्वरुपात अर्ज मागविण्यात येत आहेत.

## महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांनी घेतला विभागाच्या योजनांचा आढावा



**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील महिलांच्या सक्षमीकरणासाठी राबविण्यात येत असलेल्या आदिशक्ती अभियानासह बाल संगोपन, मिशन वात्सल्य आणि मातृ वंदना योजना यांच्या अंमलबजावणीचा सविस्तर आढावा महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांनी घेतला.

मंत्रालयात आयोजित बैठकीत सचिव डॉ. अनुपकुमार यादव, आयुक्त कैलास पगारे, सहसचिव वी. रा. ठाकूर आदीसह अधिकारी उपस्थित होते. आदिशक्ती अभियानांतर्गत महिलांच्या आरोग्य समस्या, कुपोषण, बालमृत्यू व मातृमृत्यूचे प्रमाण कमी करणे, लैंगिक व शारीरिक अत्याचारांना प्रतिबंध घालणे तसेच हिंसामुक्त कुटुंब व समाज निर्माण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. यासाठी राज्यभर ३६ जिल्ह्यांमध्ये व १५० तालुक्यांमध्ये समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. ग्रामस्तरावर समिती गठित करण्याचे काम सुरू असून उर्वरित तालुक्यांमध्ये समित्या तातडीने स्थापन करण्याचे निर्देशही महिला व बाल विकास मंत्री तटकरे यांनी दिले. कोरोना काळात सुरू झालेल्या एकल महिलांसाठीच्या योजनेची व्याप्ती वाढवून विधवा, परित्यक्ता व एकल महिला यांचा समावेश करण्यात यावा, असे निर्देश तटकरे यांनी यावेळी दिले. बाल संगोपन योजनेसाठी निधी तातडीने उपलब्ध करून देण्यात देण्यात येईल, असे त्यांनी सांगितले. तसेच मिशन वात्सल्य आणि प्रधानमंत्री मातृ वंदना योजनेचाही त्यांनी आढावा घेतला. आयुक्त कैलास पगारे म्हणाले की, मातृ वंदना योजनेअंतर्गत राज्यातील जिल्ह्यांचे शंभर टक्के मॅपिंग पूर्ण झाले असून लाभार्थींना योजनेचा थेट फायदा होणार आहे.

## आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनी अतिवृष्टीस्थितीचा घेतला आढावा

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यात गेल्या तीन चार दिवसांपासून सुरू असलेल्या अतिवृष्टीमुळे निर्माण झालेल्या परिस्थितीचा आढावा आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनी आज घेतला. आपत्ती व्यवस्थापन मंत्री श्री. महाजन यांनी राज्य आपत्कालीन कार्य केंद्रास भेट देऊन राज्यातील परिस्थितीची माहिती घेतली.

## पायाभूत विकास प्रकल्पांसाठी युनिक आयडी पोर्टल प्रशिक्षण कार्यशाळा

**छ.संभाजीनगर । प्रतिनिधी**

राज्यातील प्रत्येक पायाभूत प्रकल्पासाठी युनिक पायाभूत सुविधा आयडी संदर्भात प्रशिक्षण कार्यशाळेचे उद्घाटन विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांच्या हस्ते जिल्हा नियोजन समिती सभागृहात करण्यात आले.

यावेळी जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, नियोजन विभागाचे उपायुक्त विजय पवार, जिल्हा नियोजन अधिकारी भारत वायाळ यांच्यासह विभागातील सर्व जिल्ह्यांचे नियोजन अधिकारी उपस्थित होते. विभागीय आयुक्त श्री. पापळकर म्हणाले, युनिक पायाभूत सुविधा आयडी पोर्टल ही नवी संकल्पना असून या तंत्रज्ञानाचा वापर करून विकासकामांची सुसूत्रता, समतोल विकास व खर्चबचत साधता येणार आहे. राज्यात १ ऑक्टोबर २०२५ पासून



प्रत्येक पायाभूत प्रकल्पासाठी युनिक आयडी अनिवार्य असणार आहे. प्रशासकीय मान्यता, तांत्रिक मान्यता, देयके, तसेच मंजुरीपासून अंमलबजावणी व देखभालपर्यंत सर्व माहिती या आयडीद्वारे ट्रॅक केली जाणार आहे.

प्रशिक्षणात नव्या सुविधेची नोंद पोर्टलवर कशी करायची, मॅपिंग पद्धती, कामांचे स्वरूप व निकषांनुसार नोंदणी याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. महाराष्ट्र सुदूर संवेदन उपयोजना केंद्र, नागपूरचे श्री. अभिजित व श्री. स्वराज यांनी प्रात्यक्षिक सादरीकरण केले. प्रास्ताविक उपायुक्त (नियोजन) विजय पवार यांनी केले. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी मार्गदर्शन केले. तसेच श्री. संजय पाटील, विभाग प्रमुख (मुंबई व पुणे), महाराष्ट्र सुदूर संवेदन उपयोजना केंद्र यांनी पोर्टलच्या वापराबाबत मार्गदर्शन केले. या प्रशिक्षण कार्यशाळेत छत्रपती संभाजीनगर विभागातील सर्व जिल्हा नियोजन अधिकारी व प्रमुख यंत्रणांचे अधिकारी सहभागी झाले.

# यशवंतराव चव्हाण पंचायत राज अभियानांतर्गत गुणवंतांचा गौरव

**छ.संभाजीनगर । प्रतिनिधी**

प्रामाणिकपणे, जबाबदारीने आणि कार्यतत्परतेने काम करणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांचा गौरव हा इतरांसाठी प्रेरणादायी ठरतो, असे प्रतिपादन विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी केले. यशवंतराव चव्हाण पंचायत राज अभियानांतर्गत गुणवंत अधिकारी-कर्मचारी तसेच आदर्श ग्रामविकास अधिकारी व ग्रामसेवकांचा सन्मान सोहळा विभागीय आयुक्त कार्यालयात पार पडला. या कार्यक्रमात विभागीय आयुक्त पापळकर यांच्या हस्ते पुरस्कार वितरण करण्यात आले. कार्यक्रमाला आस्थापना विभागाचे अपर आयुक्त राजेंद्र




अहिरे, गटविकास अधिकारी राजेंद्र महाजन, कक्ष अधिकारी मिलिंद म्हस्के, दिलीप भूमरे, अनिल टेकाळे, श्रीमती सुवर्णा शिंदे यांच्यासह अधिकारी-कर्मचारी व पुरस्कार विजेत्यांचे नातेवाईक उपस्थित होते. गुणवंत अधिकारी-कर्मचारी सन्मानित

मिलिंद पाराजीराव तुरूकमारे - विस्तार अधिकारी, जिल्हा परिषद बीड, सुनील शिवाजीराव नवले - सहायक प्रशासन अधिकारी, जिल्हा परिषद बीड

मनोजकुमार मोहनराव येरोळे - सहायक लेखाधिकारी, जिल्हा परिषद लातूर, मण्मथ धोंडिबा मुक्तापुरे - कृषी अधिकारी, जिल्हा परिषद लातूर

सचिन वैजनाथ काडवादे - कनिष्ठ प्रशासन अधिकारी, जिल्हा परिषद लातूर

आदर्श ग्रामविकास अधिकारी व ग्रामसेवक सन्मानित

श्रीमती शितल त्र्यंबकराव उमप - ग्रामसेवक, पोखरी (संभाजीनगर)

नंदकिशोर विनायकराव वानखेडे - ग्रामविकास अधिकारी, जालना

सुखदेव देवसिंग शेळके - ग्रामविकास अधिकारी, जालना

मधुकर मानसिंग मोरे - ग्रामसेवक, नांदेड

कु. पुष्पा बालासाहेब काळे - ग्रामसेवक, परभणी

विजयसिंह विलासराव नलावडे - ग्रामविकास अधिकारी, धाराशिव

धनंजय रामराव भोसले - ग्रामसेवक, लातूर

गोपीनाथ भीमराव इंगोले - ग्रामसेवक, हिंगोली

दैनिक
# मराठवाडा पत्र
महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर
• संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे • जिल्हा विशेष • गुरुवार, दि. २१ ऑगस्ट २०२५ • पान ४

## थोडक्यात...

### हजयात्रा नोंदणी पहिला हप्ता भरण्यासाठी मुदतवाढ द्या: खा.सोनवणे

बीड । प्रतिनिधी



पवित्र हज यात्रा–२०२६ नोंदणी संदर्भातील पहिला हप्ता भरण्याची अंतिम तारीख दि.३०ऑगस्ट पर्यंत वाढवावी, अशी मागणी खा.बजरंग सोनवणे यांनी केंद्रीय अल्पसंख्यक मामले विभागाचे मंत्री किरेन रिजिजू यांची भेट घेऊन केली. पत्रात म्हटले आहे, पवित्र हज यात्रेला महाराष्ट्रातून मोठ्या प्रमाणात मुस्लिम बांधव जात असतात. नोंदणीसंदर्भातील पहिला हप्ता भरण्यासाठी दि.२० ऑगस्टपर्यंतच मुदत देण्यात आलेली आहे. परंतु लॉटरी जाहीर झाल्यानंतर १५ ते १७ ऑगस्टपर्यंत बँकांच्या सलग सुट्ट्या आणि बँकांमधील तांत्रिक अडचणींमुळे हज साठी इच्छुक अनेक यात्रेकरुंना वेळेत रक्कम जमा करता आली नाही. हज यात्रेसाठी जाणाऱ्या नागरिकांची अडचण लक्षात घेणे आवश्यक असून त्यांना हजला जायचे असताना नोंदणी प्रक्रियेत अडचणी निर्माण होवू नयेत, यासाठी दि.३० ऑगस्टपर्यंत मुदतवाढ देणे आवश्यक आहे. या विषयाकडे गांभिर्याने पाहून मुदतवाढ द्यावी, अशी मागणीही खा.बजरंग सोनवणे यांनी केली आहे. यावेळी केंद्रीय अल्पसंख्यक मामले विभागाचे मंत्री किरेन रिजिजू यांनी खा.बजरंग सोनवणे यांना या विषयावर वैयक्तिक लक्ष घालून आवश्यक निर्णय घेण्याचे आश्वासन दिले आहे. खा.बजरंग सोनवणे सातत्याने सामाजिक विषय मांडत असल्याने त्यांच्या पाठपुराव्याचे आणि विषय मांडणीचे कौतूक होत आहे.

### पाली येथील चारा लागवडीची ॲड. निलेश हेलोंडे: पाटील यांच्याकडून पाहणी

बीड । प्रतिनिधी

दुष्काळी परिस्थितीमध्ये ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना विविध अडचणींचा सामना करावा लागत असून, पशुधनासाठी पुरेसा चारा उपलब्ध करून देण्यासाठी मिशनच्या माध्यमातून राबविण्यात येत असलेल्या पाली येथील चारा लागवडीच्या उपक्रमाला कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ॲड. निलेश हेलोंडे पाटील यांनी प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी करत समाधान व्यक्त केले. यावेळी जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी श्री. थोरात, गट विकास अधिकारी श्री. राठोड, ग्रामपंचायतीचे सरपंच यांच्यासह महसूल मंडळ अधिकारी पाली, श्रीमती चाटे, ग्राम महसुल अधिकारी अनिल गायकवाड, ग्रामसेवक शंकर वाघमारे तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी अध्यक्ष ॲड. निलेश हेलोंडे पाटील म्हणाले की, गायरान जमिनीवर चारा लागवड करुन, शेतकरी कुटूंबांना दुग्ध व्यवसायाच्या माध्यमातून शाश्वत अर्थिक उत्पन्नासाठी प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. अनेक कुटूंबाकडे चारा लागवडीसाठी स्वत:ची जमीन नसल्यामुळे शासनामार्फत गायरान जमिनीवर चारा लागवड करून त्यांना मदत करण्यात येत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचा चाऱ्यासाठी होणाऱ्या खर्चाची बचत होणार आहे. पारंपरिक पद्धतींसोबतच आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केल्यास कमी जागेतही भरपूर उत्पादन घेता येते. यामुळे चारा टंचाईवर मात करता येईल. तसेच पशुधनाचे पोषण व्यवस्थित होईल तसेच रोजगार निर्मिती, कार्बन क्रेडिट निर्माण, जमिनीची सुपीकता वाढविणे यासारखे अनेक फायदे होणार आहेत. तसेच पाऊस कमी पडल्यास या क्षेत्रास पाण्याची व्यवस्था करण्यात यावी, अशा सूचना त्यांनी यावेळी दिल्या. यावेळी ॲड हेलोंडे यांनी ग्रामस्थांशी संवाद साधुन त्यांच्या समस्या जाणुन घेत. मिशनतर्फे राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती देवून, शेतकऱ्यांनी त्या योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहनही केले. त्यांनी विशेषतः सामुदायिक स्तरावर चारा लागवड, साठवणूक केंद्रांची उभारणी, जलसंधारणाच्या उपाययोजना व पाणी बचतीच्या आधुनिक तंत्रांचा अवलंब करण्याचे महत्व अधोरेखित केले. तसेच त्यांना चारा लागावडीकरीता प्रोत्साहित केले.

### नाथ्रा येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक उभा करा – गौतम आदमने

#### बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर नाथ्रा ग्रामस्थांचे अमरण उपोषण सुरू



बीड । प्रतिनिधी

बीड प्रतिनिधी – नाथ्रा येथील नियोजित स्मारकाची जागा ग्राम पंचायत नमुना नं ८ अ ला नोंद करून पुतळ्या समोरील जिर्ण अवस्थेत असलेल्या सभागृहाच्या ठीकाणी सुसज्ज बौद्ध विहाराची निर्मिती करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भव्य स्मारक तयार करावे या मागणीसाठी नात्रा येथील ग्रामस्थांचे गौतम आदमाने यांच्या नेतृत्वाखाली अमरण उपोषण सुरू झाले आहे. जिल्हाधिकारी कार्यालय बीड यांना लेखी निवेदन दिले होते आद्याप पर्यन्त प्रशासनाकडून कसल्या प्रकरची दखल घेतली नसल्यामुळे गेली अनेक वर्ष नाथ्रा गावातील बौद्ध बांधवांच्या मागणी प्रमाणे प्रशासन दखल घेत नसून महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक निर्माण करण्याकरीता ग्राम पंचायत, गटविकास अधिकारी, तहसिलदार, उपविभागीय अधिकारी परळी वै. यांच्या कडून महामानवाची अवहेलना होत आहे म्हणून नाथ्रा बौद्ध बांधव आज दि. २०/०८/२०२५ रोजी पासून मा. जिल्हाधिकारी कार्यालय बीड सामोर आमरण उपोषणा सुरुवात केली आहे.सदर आंदोलनात काही अनुचित प्रकार जिवित हानी झाल्यास प्रशासन जबाबदार राहील.असे आंदोलनकर्त्यांनी म्हटले आहे. नाथ्रा येथील समस्त बौद्ध बांधव त्यामध्ये महिला पुरुष बालक मोठ्या संख्येने आंदोलनात सहभागी झाले आहेत.

## नुकसानग्रस्त भागाचे पंचनामे करून शेतकऱ्यांना तात्काळ मदत करा: डॉ ज्योती मेटे

### जिल्हाधिकाऱ्यांची घेतली भेट

बीड । प्रतिनिधी

आमागील तीन दिवसापासुन जिल्ह्यात सतत पर्जन्यवृष्टी होत आसुन हजारो हेक्टर पीक क्षेत्र बाधीत झाले आहे. शासनाने घरांचे नुकसान, जिवीत हानी, पशुधन व शेतीचे नुकसान भरपाईचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना दिले असल्याने आपण महसुल यंत्रणेकडून अतिशीघ्र महसुल मंडळनिहाय पाहणी करून नुकसान भरपाई देण्याबाबत कार्यवाही करावी अशी मागणी शिवसंग्राम अध्यक्ष डॉ. ज्योतीताई विनायकराव मेटे यांनी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या कडे केली आहे.



जिल्ह्यात पावसामुळे हजारो हेक्टरवरील शेती पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांची सरकारने दखल घेतली आहे. त्यानुसार नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना लवकरच सरकार मदत देणार असल्याची घोषणा केली आहे. यासाठी जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांना नुकसानाचे पंचनामे करून तात्काळ अहवाल देण्यास सांगितले आहे. त्यामुळे जिल्हाधिकारी आणि प्रशासनाने जिल्ह्यातील नुकसानीचे तात्काळ पंचनामे करून त्याचा अहवाल तातडीने सादर करावा अशी मागणी यावेळी डॉ. ज्योती मेटे यांनी केली आहे याप्रसंगी शिवसंग्राम जिल्हा सरचिटणीस अनिल घुमरे, तालुकाध्यक्ष पंडितराव माने, किसान आघाडीचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र आमटे, सामाजिक न्याय विभागाचे जिल्हाध्यक्ष सुनील शिंदे, मनोज जाधव,शेख आबेद, ज्ञानेश्वर कोकाटे, दादा गोंदावले, प्रा.पंडित शेंडगे, मंगेश माने आदी सह शेतकरी व शिवसंग्रामचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

## 2011 पूर्वीच्या शासकीय जागेवरील अतिक्रमणाचे नियमन; आ. नमिता मुंदडा यांच्या हस्ते लाभार्थ्यांना पट्टे प्रदान

अंबाजोगाई । प्रतिनिधी

सर्वांसाठी घरे २०२२ या धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीअंतर्गत अंबाजोगाई शहरात शासकीय जागेवरील अतिक्रमणांचे नियमन करण्याची प्रक्रिया सुरू आहे. या उपक्रमातून अनेक कुटुंबांना त्यांच्या निवाऱ्याचा कायदेशीर हक्क मिळत असून, शहरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळत आहे.



या उपक्रमाचा भाग म्हणून गट क्र. ५९५, माता रमाई चौक येथे राहणाऱ्या २० लाभार्थ्यांना शासकीय जागेवरील अतिक्रमण नियमानुसार प्रमाणित करण्यात आल्याचे अधिकृत प्रमाणपत्र आमदार नमिता मुंदडा यांच्या हस्ते वितरित करण्यात आले. आ. मुंदडा यांनी या निर्णयासाठी वेळोवेळी शासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला होता. त्यांच्या प्रयत्नांना यश मिळाल्याने शहरातील अनेक कुटुंबांना आपल्या घराचा कायदेशीर दर्जा प्राप्त होणार आहे. या योजनेतून एकूण १०४९ लाभार्थ्यांना पट्टे मिळणार असून, प्रत्येक कुटुंबाला सुरक्षित व कायदेशीर घराचा हक्क मिळणार आहे. याप्रसंगी आ. नमिता मुंदडा म्हणाल्या की, घर हे प्रत्येक ▶ उर्वरित पान २ वर

## आष्टीत श्री संत सेना महाराज यांची पुण्यतिथी उत्साहात साजरी



आष्टी । प्रतिनिधी

श्री संत सेना महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त आष्टी शहरातील भाजी मंडई जवळील श्री संत सेना महाराज मंदिरात बुधवार दि २० ऑगस्ट रोजी नाभिक समाजाच्या वतीने भक्तिभावाने पुण्यतिथी उत्साहात साजरी करण्यात आली.

पुण्यतिथी निमित्त मंदिरात श्री संत सेना महाराज यांच्या प्रतिमेचे विधिवत पूजन करून अभिवादन केले गेले. या कार्यक्रमादरम्यान सर्व उपस्थितांनी श्री संत सेना महाराज यांच्या तत्त्वज्ञानाचा आणि समाजासाठी केलेल्या अमूल्य कार्याचा ▶ उर्वरित पान २ वर

## डिजिटल मीडिया परिषदेच्या राज्यव्यापी अधिवेशनासाठी हजारोंच्या संख्येने उपस्थित राहावे : प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे

वडवणी । प्रतिनिधी

१४ सप्टेंबर २०२५ रोजी छत्रपती संभाजीनगर येथे अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेशी संलग्न असलेल्या डिजिटल मीडिया परिषदेचे पहिले राज्यव्यापी अधिवेशन मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख सर यांच्या अध्यक्षतेखाली होत असुन या राज्यव्यापी अधिवेशनासाठी हजारोंच्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन डिजिटल मिडिया परिषदेचे प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे यांनी केले आहे.



याबाबत अधिक वृत्त असे की, मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त श्री.एस.एम. देशमुख सर यांच्या आदेशानुसार राज्यातील सर्व ३६ जिल्ह्यात डिजिटल मिडिया परिषदेचे जाळे निर्माण करण्याचं काम आम्ही घेतलं आहे. राज्यातील जवळपास ३० जिल्ह्यात जिल्हास्तरीय कार्यकारिणीच्या निवडी जाहीर केल्या गेल्या आहेत. उर्वरित जिल्ह्यांत सुध्दा डिजिटल मिडिया परिषदेच्या जिल्हा पदाधिकारी निवडी संदर्भात यंत्रणा उभी केली गेली आहे. महत्वाचे म्हणजे या राज्यव्यापी अधिवेशनात परिषदेशी जोडल्या गेलेल्या या पत्रकारांना एकत्र करून डिजिटल माध्यमांची तांत्रिक माहिती देणे, तसेच परस्पर सुसंवाद, येणाऱ्या अडचणी यांची चर्चा करणे हा या अधिवेशनाचा उद्देश ▶ उर्वरित पान २ वर

## अतिवृष्टीमुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांचे तात्काळ पंचनामे करा -उपसभापती श्रीहरी मोरे

### हेक्टरी ५० हजार रुपयांची मदत द्यावी

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यात गेल्या ५ ते ६ दिवसापासून झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या पिकांच्या मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या पिकांचे तात्काळ पंचनामे करून शेतकरी बांधवांना हेक्टरी ५० हजार रुपयांची मदत द्यावी अशी मागणी कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती श्रीहरी (नाना) मोरे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केली आहे.



गेल्या ५ ते ६ दिवसापासून माजलगाव तालुक्यात अतिवृष्टी झाल्यामुळे शेतकऱ्यांचे सोयाबीन, तूर, कापूस, बाजरी, हे पिके पूर्णतः पाण्यात गेले असून ऊस देखील बऱ्याचठिकानी खाली पडून शेतकरी बांधवांच्या हाता तोंडाशी आलेला घास निघून गेल्याने शेतकरी बांधव हातबल झालेले असून प्रशासनाने अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांचे तात्काळ पंचनामे करून हेक्टरी ५० हजार रुपये मदत द्यावी अशी मागणी कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती श्रीहरी (नाना) मोरे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केली आहे

## जागतिक छायाचित्र दिनानिमित्त आष्टी तालुका फोटोग्राफर असोसिएशनच्या वतीने महाकाय कॅमेऱ्याचे पूजन

आष्टी। प्रतिनिधी

मंगळवार दिनांक १९ ऑगस्ट रोजी जागतिक छायाचित्र दिनानिमित्त आष्टी तालुका फोटोग्राफर असोसिएशनच्या वतीने तब्बल १२ फुटी महाकाय कॅमेऱ्याचे पूजन करून जागतिक छायाचित्र दिन साजरा करण्यात आला.



आष्टी तालुका फोटोग्राफर असोसिएशनच्या वतीने दरवर्षी विविध उपक्रम राबवून हा दिवस साजरा करण्यात येतो.यंदा १२ फूट उंचीच्या कॅमेराची प्रतिकृती साकारून तालुक्यातील शंभरहून अधिक फोटोग्राफर बांधवांच्या तसेच युवा नेतृत्व जयदत्त धस यांच्या उपस्थितीत हा अविस्मरणीय सोहळा संपन्न झाला.यावेळी आधुनिक ▶ उर्वरित पान २ वर




## गणेशोत्सव - ईद ए मिलाद सण एकात्मतेने जबाबदार नागरिक म्हणून साजरा करावे : जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन

बीड । प्रतिनिधी

आगामी कालावधीत येणाऱ्या गणेशोत्सव आणि ईद ए मिलाद हे सण सर्व नागरिकांनी कायदा व सुव्यवस्था आणि सामाजिक शांतता सलोखा अबाधित ठेवत हे सण आनंदाने आणि शांततेत साजरे करावेत असे आवाहन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी केले.





जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन सभागृहात आयोजित गणेशोत्सव शांतता समितीच्या बैठकीत जिल्हाधिकारी जॉन्सन बोलत होते. यावेळी बैठकीस निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, उपविभागीय अधिकारी कविता जाधव, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विलास जाधव, जिल्हा अधिक्षक कार्यालयातील अतिरिक्त पोलीस अधिक्षक सचिन पांडकर, तहसीलदार, मुख्याधिकारी, पोलीस निरीक्षक, तसेच आरोग्य, अग्निशमन, वीज वितरण, पाणीपुरवठा, परिवहन व नगरपरिषद यासारख्या विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते. तसेच जिल्ह्यातील विविध सार्वजनिक गणेश मंडळांचे पदाधिकारी व समाजातील मान्यवर नागरिकही या बैठकीस उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्री जॉन्सन म्हणाले की, गणेशोत्सव हा सामाजिक एकोप्याचा आणि श्रद्धेचा सण आहे. प्रशासन आणि गणेश मंडळांनी परस्पर समन्वयाने उत्सव सुरळीत पार पाडावा. या पार्श्वभूमीवर उत्सव काळात शांतता, सौहार्द व कायदा–सुव्यवस्थेची योग्य अंमलबजावणी व्हावी. गणपती उत्सव आणि ईद ए मिलाद ▶ उर्वरित पान २ वर